# पद्मभूषण वसंतदादा पाटील

डॉ. मोहन पाटील

तथाकथित रूढ, पारंपरिक शिक्षणापेक्षा स्वानुभवातून शिकत रहाणे, मुंगीप्रमाणे स्वानुभवी शहाणपणाचे कणकण गोळा करून हजारोंच्या हातांनी सामाजिक, सहकारी विधायक कार्याचा आश्चर्यजनक मेरू पर्वत उभा करणे ही जन्मजात वृत्ती ज्यांच्या रक्तातच होती त्या, सांगलीच्या नावाची नोंद आपल्या अर्थपूर्ण जगण्याने भारताच्या पटलावर करणाऱ्या कै. वसंरावदादांच्या विषयी बोलणे अगर लिहिणे ही गोष्ट मोहरीच्या इटुकल्या दाण्यावर महाकाय हत्तीचे चित्र काढण्याइतकी कठीण आहे. कै. वसंतदादा पाटील सांगली जिल्ह्यातील 'पद्माळ' या छोट्या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मले होते. ही त्यांची औपचारिक नोंद आहे. पण पद्माळेच्या कृष्णाकाठच्या क्रांतिकारी मातीतले हे रोपटे वाढत जाऊन त्याची पाळंमुळं कृष्णेपासून ते थेट यमुनेपर्यंत पसरत जाऊन राष्ट्रभर पसरत राहिली. अशा एका अजानवृक्षाची ती लोकदप्तरी नोंद आहे आणि तोच त्यांचा खरा परिचय आहे. तो मुळातून समजून घेणे गरजेचे आहे. कै. दादांनी कळत्या वयात देशाचा तिरंगा हातात घेतला आणि अखेरीस तोच तिरंगा आपल्या देहावर पांघरून त्यांनी इहलोकीचा निरोप घेतला.

दादा फारसे शिकलेले नव्हते हे अनेकांना ज्ञात आहे. शाळकरी वयात सांगलीमध्ये दत्तू एडेकर नावाचा त्यांचा एक जिवलग मित्र होता. या त्यांच्या जिवलगाचा अकाली मृत्यु झाला. या घटनेचा त्यांच्यावर मोठा आघात झालाा. व्ह. फा. पास झाल्यावर या मित्राच्या सोबतीनेच त्यांनी इंग्रजीचा क्लास जॉईन केला होता. मित्र गेला. मित्राशिवाय शाळेत गोडी वाटेना. दादांनी मग थेट शिक्षणालाच रामराम ठोकला. ही तशी साधीच गोष्ट आहे. पण ही साधी वाटणारी गोष्टच त्यांच्या आंतरिक, भावनिक मनाच्या बैठकीवर सूक्ष्म प्रकाश टाकणारी आहे. माणसांबद्दलचा जिव्हाळा, प्रेम आणि त्यापायी वैयक्तिक, व्यावहारिक फायद्यातोट्यांना निग्रहाने दूर सारण्याचा वृत्तिधर्म जो आयुष्यभर त्यांच्या अंगी वावरत होता. त्याचे बीज बारा–तेरा वर्षांच्या वयातच त्यांच्या मनोभूमीत अंकुरले होते. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या सार्वजनिक, राजकीय जीवनातील अनेक महत्त्वाच्या धोरणांमध्ये निर्णयांमध्ये आणि घटनांमध्ये मिळून येते. हा झरा 'मूळचाची खरा' होता. येवढेच खरे.

दादांच्या जीवनचरित्राचे विहंगावलोकन केल्यावर त्यांच्या वृत्तींमध्ये, त्यांच्या अर्धशिक्षित पण शहाण्या व्यक्तिमत्त्वात तीन अत्यंत महत्त्वाचे प्रकाशझोत तरळतांना दिसतील. हे त्यांचे त्रिगुणच होते. त्यांच्याठिकाणी उपजतच फुले–शाहूंचा बहजनांबद्दलचा कळवळा होता. ज्या कुटुंबातून ते निपजले होते त्या भूमिपुत्रांच्या विकासवाढीची आस होती. लो. टिळकांसारख्या बाणेदार राष्ट्रीय नेत्यांच्या क्रांतीची धग उरात धुमसत होती आणि गांधींसारख्या कडव्या सत्याग्रहीच्या 'सुराज्य' या शब्दाचे निनाद त्यांच्या अंत:करणात तरंग उठवंत होते. खळबळ माजवीत होते.
त्यांच्या जीवनातील साध्या पण महत्वाच्या तीन घटनांचे विश्लेषण इथे तपासले तर या गोष्टी अधिक स्पष्ट होतील.

एक आहे पद्माळे गावातील 'कृष्णाघाटाची'. स्वातंत्र्यपूर्व काळात 'ग्रामसुधारणा मंडळ' या नावाचे एक मंडळ पद्माळे गावात पोरापोरांनी सुरु केले होते. हे मंडळच एका तालमीत जात असे. बैठका होत. बलोपसना ही तरुणांनी सार्वजनिक, सामाजिक विधायक कार्यासाठीच करावी हे त्यांचे सूत्र होते. बैठकीत ह्याच सूत्राच्या आधारे तरुणांनी गावकऱ्यांच्या मदतीने 'कृष्णा घाटाचा' स्वर्ग गाठला. गोष्ट अशी की, गाव नदीकाठी, पावसाळ्यात कृष्णामाई रुद्रावतार धारण करायची, तिचे पाणी पाणवठ्याच्या खोलगट सरळीतून गावाकडे फुगायचे. पूर ओसरला की नदी पात्रात, आणि तिने वाहून आणलेला गाळ पाणवठ्याच्या वाटेवर. मग गुडघाभर चिखलातून बाया–बापड्यांची हाकेच्या अंतरावरील पाण्याकडे घागरी घेऊन जायच्या. ढोपरभर गाळात रखडत पडत पाण्याची घागर आणणे

म्हणजे दिव्य वाटायचे. खूप हाल व्हायचे. नदी शेजारीच. पण पाण्याला वाट नाही. पाण्यासाठी नुसते गाळाकडेच बघत राहायचे. वर्षांनुवर्षे हेच सुरु होते. थोडे जुजबी काम व्हायचे पण दुसऱ्या वर्षी ते पुरात वाहून जायचे. मग पुनःश्च हरिॐ. तालमीतल्या मंडळाने 'दुस्तर या वाटेचा'वषयच निकालात काढायचा ठरवला आणि श्रमदानातून सबंध गावकऱ्यांच्या मदतीने गावासाठी पक्का 'कृष्णाघाट' च बांधून काढला.
पायाभूत सोयी हा शब्द आज सर्वतोमुखी झाला आहे. दादांनी पोरकट वयात जगन्नाथाचा रथ ओढून गावासाठी पायाभूत सोय करून टाकली. एकीचे बळ कसे असते? संघटनेचा वापर कशासाठी करावा. सामूहिक इच्छाशक्तीची ताकद विधायक कार्यात कशी वापरावी याचा एक आदर्श वस्तुपाठच शिल्पांकित करून ठेवला. ही गोष्ट वाटते तेवढी साधी नाही.

अशीच एक गोष्ट १९३० सालची. सोलापूरच्या ताडीच्या सत्याग्रहाची. स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय असंतोषाने तरुण वर्ग पेटला होता. आधीच्या लो. टिळकांसारख्या राष्ट्रीय नेत्यांनी तरुणांमध्ये अंगार फुलवला होता. सोलापूरच्या तरुणांनी हिप्परगी तलावापाशी असलेले ताडीच्या झाडांचे जंगलच तोडण्याचा घाट घातला. कारण स्पष्ट होते आणि ब्रिटिशांबद्दलचा संताप त्यापाठीमागे उसळत होता. तो परिस्थितीजन्य निर्णय होता. ब्रिटिश अधिकारी आणि पोलिस यांनी दंडशक्ती वापरून आंदोलन मोडून काढायचा घाट घातला, जमाव खवळला. मग पोलिसांनी जमावावर बेछूट गोळीबार केला. असंख्य सत्याग्रही जखमी झाले. जखमींना खांद्यावर घेऊन सत्याग्रही पोलिस चौकीजवळ गोळा झाले. ते दाद मागू लागले. पण अधिकाऱ्यांनी त्यांच्याबरोबर बेछूट वर्तन केले. मग सत्याग्रहींची माथी भडकली. जमावाने पोलिस स्टेशनलाच आग लावली. या गंभीर घटनेमुळे सरकार अस्वस्थ झाले. सत्याग्रहींवर खटले भरले. या ग्रुह्याबद्दल लष्करी कोर्टाने मल्लाप्पा धनशेट्टी, किसन सारडा, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे या चौघा क्रांतिकारकांवर आरोप ठेवून त्यांना फाशीची शिक्षा दिली.

या घटनेचा दादांच्या तरुण मनावर खोल आघात झाला. रक्तामध्ये प्रश्नचिन्ह उभे राहिले ? फाशी ? कोणाला ? कशासाठी ? तू या अमानुष अत्याचारी दंडशक्तीच्या निर्दालनासाठी काय करणार सांग ? मोठे प्रश्नचिन्ह ! आतून उत्तर आले. 'मी या माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी पेटलेल्या सशस्त्र क्रांतिकार्यात स्वत:ला झोकून देणार'
दादांना स्वातंत्र्य सेनानी म्हणत असताना त्यांच्या मनात पडलेली 'ताडी सत्याग्रहाची' ठिणगी आणि त्यातून पुढे रेल्वेचे रुळ उखडणे, सरकारी तिजोरी लुटणे, गोव्यात जाऊन शस्त्रे आणणे या घटनाचक्राचा जो वणवा भडकत राहिला तो सशस्त्र क्रांतीच्या उठावाच्या उर्मीनेच.

तिसरा प्रसंग आहे. १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीचा. स्वातंत्र्य मिळाले त्या रात्री सांगली परिसरात धो धो पाऊस सुरु होता. दीडशे वर्षांचे ताप–पाप त्या पावसात धुवून वाहून गेले. दादांना वाटले, काम झाले. आता कोणाशी संघर्ष ? त्या रात्री दादांच्या मनातील क्रांतिकारकाने मनोनिग्रह केला. वृत्ती पालट घडवला. त्यांनी आपली बंदूक, पिस्तूल, काडतुसे या हिंसक वस्तू कृष्णामाईच्या पुरात फेकून दिल्या. आंघोळ केली आणि भारतीय स्वातंत्र्याच्या तिरंग्यापुढे शपथ घेतली – ''मी वसंत बंडुजी पाटील, रा. पद्माळे जि. सांगली अशी शपथ घेतो की हाती शस्त्र धरणार नाही. देश हेच यापुढे माझे कुटुंब राहील. देहात प्राण असेतोपर्यंत मी सार्वजनिक हितास्तव सर्व ते काम करीत राहीन. माझे जगणे हा सर्वांसाठी उघडा सार्वजनिक ग्रंथ राहील.''

वसंतरावदादांच्या नावातच एका सर्जनशील प्रेरणादायी ऋतूचे नाव आहे. वसंताप्रमाणेच आयुष्यभर त्यांनी सार्वजनिक विविध कामातून अनेक निष्पर्ण समूहांना पालवी दिली. त्यांची वाणी गोड होती. चेहरा नेहमी प्रसन्न ! लोक घरातील वडील भावाप्रमाणे दादाप्रमाणेच त्यांना भेटत. एक भीतीयुक्त आदर वाटत होता. दादा तिरंगा घेऊन

रणसंग्रामात उतरले. तिरंगा लपेटून परलोकी गेले. ज्या कुणा राजकीय इच्छाशक्ती धारकांस काही कार्य करावयाचे आहे. त्याने तिरंग्याच्या वृत्तीविशेषाचे सदैव स्मरण ठेवावे. त्यातला भगवा रंग हा राष्ट्राचा माथा आहे. तो क्रांती आणि वैराग्याचे एकत्रित प्रतिक आहे. तो नि:शस्त्र सन्याशीही आहे. प्रसंगी क्रांतिकारकही आहे. हिरवा रंग भूमीचा. भूमी हरित ठेवणाऱ्या भूमिपुत्रांचा, कष्टकऱ्यांचा आहे. या दोन्हीचा समन्वय साधणारा निष्कलंक पांढरा रंग भूमी आणि देशाचा माथा यामध्ये निर्वेद, शांतीपूर्ण समन्वय साधणारा आहे. हा समन्वय साधूनच राष्ट्राचा माथा हिमालयाएवढा उंच ठेवता येईल. तिरंग्याची आस बाळगणाऱ्या प्रत्येकास दादांसारख्या असंख्य भूमिपुत्रांचा हा दिव्य संदेशच आहे.